
REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019

# भारतीय इतिहासलेखनावर मार्क्सवादाचा प्रभाव

**प्रा. रमेश नरसिंग थोरात**
**एम.जे.एस.कॉलेज, श्रीगोंदा, जि. अहमदनगर.**

## प्रस्तावना



मार्क्सवादी इतिहासलेखन शास्त्राचा उद्‌गाता कार्ल मार्क्स होय. मार्क्सने आपल्या सिध्दांताच्या आधारे इतिहासात एक प्रवाह निर्माण केला जो मार्क्सवादी इतिहासलेखन म्हणून ओळखला जातो.

५ मे १८१८ रोजी रशियातील ट्रेवलेस येथे मध्यमवर्गीय कुटूंबात कार्लमार्क्सचा जन्म झाला. लहानपणापासून मार्क्स अतिशय हुशार होता. त्याला तत्वज्ञान, कायदा इतिहास असे विषय आवडत होते. प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्याने बॉन विद्यापीठात प्रवेश घेतला. त्याच विद्यापिठात प्राध्यापक म्हणून काम करण्याची त्यांची इच्छा होती. परंतु क्रांतीकारक विचारांमुळे त्यांना ही जागा मिळविता आली नाही. पुढे क्रांतीकारक विचारांमुळे त्यांना जर्मनीतून पळ काढावा लागला. प्रोंन्धा आणि लुई ब्लन्क या समाजवादी फ्रेंच विचारवंतामुळे त्याने फ्रेंच कम्यूनिझम आणि राजकीय अर्थशास्त्र यांचे अध्ययन केले. या सुमारास त्यांची फ्रेड्रीक एंगल्स यांच्याशी भेट झाली आणि या भेटीचे पुढे गाढ मैत्रीत रुपांतर झाले. मार्क्सने 'दास कॅपिटल' व 'कम्युनिष्ट मेनोफेस्टो' हे दोन ग्रंथ म्हणजे साम्यवादाचे तत्त्वज्ञानच होय?[१]

मार्क्सवादी इतिहासलेखनाचा प्रारंभच इ.स. १८४८ पासून होतो. कार्ल मार्क्सचे इतिहास लेखनात जो नवा प्रवाह सुरु केला तो मार्क्सवादी इतिहास लेखन म्हणून ओळखला जातो. आर्थिक घडामोंडीचा इतिहास हा इतिहास लेखनातील एक नवा प्रवाह म्हणून पुढे आला. कामगार, शेतकरी, शोषित, पीडीत इत्यादीचे इतिहास रेखाटण्याचे काम प्रत्येक देशातील इतिहासकार करु लागले. परंतु राजसत्तेच्या इतिहास रेखाटण्याचे काम जगातील बहुतांश देशातील इतिहासकारांनी सोडून दिले आहे.[२]

१९ व्या शतकात इतिहसाकडे पाहण्याचे जे विविध दृष्टीकोन निर्माण झाले. त्यापैकी इतिहासाचा आर्थिक बाजूने अर्थ लावण्याचा जो प्रयत्न झाला त्यास मार्क्सवादी इतिहास लेखन हे नाव आहे. इतिहासाला मानवी घडामोडीला भौतिक बाजू असतात. माणसांच्या कृती त्यांच्या आर्थिक गरजांतून व हितसंबंधातून निर्माण होतात हा विचार १९ व्या शतकात एकदम नव्याने सांगितला गेला असे नाही. मार्क्सपूर्वी काही विचारवंतांनी यासंदर्भात विचार मांडले होते. पण इतिहासाचे आर्थिक, भौतिकदृष्टया विश्लेषण कार्ल मार्क्सने खऱ्या अर्थाने केले आहे.[३]

मार्क्सने आपल्या तत्वज्ञानामध्ये आर्थिक घटकांना गरजेपेक्षा जास्त महत्त्व दिले. मार्क्सच्या वर्गसंघर्षाच्या सिध्दांतामध्येही उणिवा आहेत. मार्क्सने असे भाकीत केले होते की, भांडवलशाही व कामगारवर्गात एकमेकांविरुध्द उभे राहतील परंतु कामगारांची हुकूमशाही ही संकल्पना यशस्वी ठरली नाही. राज्य (State) विरुन जाईल हा विश्वास ही खरा ठरला नाही. वर्गविहिन समाजही अस्तित्त्वात येण्याची चिन्हे दिसत नाहीत. मार्क्सने इतिहासाची विभागणी चार विभागात केली आहे ती सुध्दा तात्त्वीक वाटत नाही. मार्क्सने मानसशास्त्रीय घटकांचा कधीच विचार केला नाही.[४]

भारतीय मार्क्सवादी इतिहास लेखन इरफान हबीब यांच्या मते, मध्ययुगीन भारताचा इतिहास समजुन घ्यावयाचा असेल तर केवळ मराठा-मोगल संघर्ष समजून चालणार नाही तर तत्कालीन शेतकऱ्यांच्या कारागिरांच्या, कष्टकऱ्यांच्या परिस्थितीमधून तसेच आर्थिक घडामोडीच्या वृत्तांतातून समजून घ्यावा लागेल.

नेमकी हीच भूमिका दिल्ली व अलिगड येथील विश्वविद्यालयात इतिहासाचे प्रोफेसर म्णून काम केलेले हरुान हबीब यांनी मांडली आहे. त्यांचे इतिहासलेखन हे मध्ययुगीन मोगल कालखंडाविषयी आहे. हबीब यांनी मागलांच्या राजकीय इतिहासाचा त्यांनी अभ्यास केला नाही तर आर्थिक इतिहासाचा मागोवा घेतला आहे.[५]

इतिहासकार डॉ. आर.एम. शर्मा यांनी प्राचीन भारतीय इतिहास लेखनावर अभ्यास केला. त्यांनी राजनैतिक विचारांच्या मागे जाती, वर्ण, धर्म व अर्थव्यवस्था यांची भूमिका समजून घेतल्याशिवाय राजनैतिक विचार समजून घेता येत नाहीत. थोडक्यात शर्मा यांनी धर्म व अर्थव्यवस्थेला इतिहासात महत्त्वाचे स्थान दिले आहे.[६]

डॉ. डी.कोसंबी यांनी कोसंबीनी प्राचीन भारतातील गुलामगिरीचे विश्लेषण केले आहे व भारतातील गुलामगिरीचे नेमके स्वरुप स्पष्ट केले आहे. कोणत्याही सामाजिक संक्रमणाचा पाया आर्थिकच असतो असा मार्क्सवादाचा सिध्दांत प्रमाण माणून प्राचीन भारतीय इतिहासाचा ते मागोवा घेतात. सिंधू संस्कृतीतील लोकांनी मेसोपोटेमियन लोकांप्रमाणे अतिरिक्त उत्पादन का केले नाही? गुप्तांनी संस्कृत वाङ्‌मयाचा जसा मोठा विकास केला तसा मौर्यांनी का केला नाही? बौध धर्म, जैनधर्म, अजीवक व इतर धर्मपंथ एकाचवेळी उदयास आले व तेही मगध राज्यातच का? या विविध प्रश्नांची उत्तरे मार्क्सवादी दृष्टीकोनातून शोधण्याचा त्यांनी प्रयत्न केला. कोसंबीनी अत्यंत सखोल व अर्थपूर्ण असे इतिहासलेखन केले. आर्थिक व सांस्कृतिक इतिहासावर त्यांनी भर दिला. विज्ञानदृष्टी व चिकित्सा हे दोन गुण प्रामुख्याने त्यांच्यात असल्याने त्यांनी एकाहुनएक महत्वपूर्ण विचार व संकल्पना मांडल्या. इतिहासाचे प्रश्न नव्याने विचारण्याची पध्दती उदयास आली हे कोसंबीचे मुख्य योगदान आहे.

मोहमद हबीब यांचा जन्म उत्तर प्रदेशातील एका सधन कुटूंबात झाला. त्यांना Father of Modern Muslim Historiography म्हणून ओळखले जाते. आपल्या ग्रंथात ते म्हणतात मोहमद गझनीने भारतातवरील आक्रमण हे इस्लाम धर्माच्या प्रसारासाठी नव्हते तर संपत्ती (सोने) लुटणे व हत्ती मिळवणे यासाठी होते अशी स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली होती. परंतु हा निष्कर्ष कट्टर धर्मनिष्ठ मुसलमानांना आवडला नव्हता. त्यांच्या विचारातुन मार्क्सवादी विचारांचे दर्शन होते.

रोमिला थापर यांनीही मार्क्सवादी दृष्टीकोनातून इतिहास लेखन केले. त्यांनी १९६६ साली History of India हा इतिहास ग्रंथ प्रकाशित केला. त्यत १६ व्या शतकापर्यंत युरोपियनांच्या आगमनापर्यंची माहिती यात देण्याचा त्यांनी यथाचीत प्रयत्न केला आहे. भारतीय जीवनाचे अनेक पैलु यात आहेत. भारताच्या राजकीय इतिहासाच्या चौकटीत त्यांना आर्थिक, धार्मिक, साहित्यिक, कला, सांस्कृतिक इत्यादी बाबींचे अंतरंग रेखाटण्याचा त्यांचा प्रयत्न महत्त्वाचा आहे.

रोमिला थापर यांनी १९५८ साली लंडन विद्यापीठातून Ph.d. मिळविली 'सम्राट अशोक व मौर्य साम्राज्याचा ऱ्हास हा Ph.d. चा विषय होता. अशोकावरील त्यांचा ग्रंथ प्रमाणभूत मानला जातो. त्यात त्यांनी मौर्यकालीन सामाजिक व आर्थिक बाबींवर अधिक भर दिला आहे. ही लिखान मार्क्सवादाकडे झुकलेले आहे.

कार्ल मार्क्सच्या इतिहास लेखनाचा प्रभाव भारतीय इतिहासलेखकांवर पडला. म्हणून त्यांना मार्क्सवादी इतिहास लेखन म्हणून ओळखतात. मार्क्सने इतिहासाची मांडणी आर्थिक पायावर केली. इतिहासातील कोणतीही घटना आर्थिकतेशी निगडीत असते ही भूमिका मार्क्सने मांडली. सुरुवातीला अनेकांनी त्याला विरोध केला. परंतु इतिहास लेखनात जी प्रगल्भता येत गेली तशी मार्क्सनी विचार सरणीचा सर्वांना विचार करावा लागला. तो विचार भारतात रुजल्यामुळे आधुनिक काळात अनेकांनी हा इतिहासलेखनाचा प्रवाह स्विकारला.

भारतीय इतिहासलेखन हबीब यांना तत्कालीन शेतकऱ्यांच्या कारागिरांच्या कष्टकऱ्यांच्या अभ्यास करताना आर्थिक घडामोंडीचा अभ्यास करावा लागतो ही भूमिका मांडली डॉ.आर.एम. शर्मा यांनी राजनैतिक विचारांच्या मागे जाती, धर्म, अर्थव्यवस्था यांची भूमिका समजून घेतल्याशिवाय राजनैतिक विचार समजून घेता येत नाही. डी.डी. कोसंबी यांनीही कोणत्याही सामाजिक संक्रमणाचा पाया आर्थिक असतोअशी भूमिका मांडली. इरफान हबीब यांनीही महमंद गझनीचे आक्रमण संपत्ती लुटण्यासाठीच होते असे मत मांडले. म्हणजे आक्रमण वेगवेगळया कारणांनी झाली असली तरी आर्थिक बाबही महत्वाची असते अशी भूमिका मांडली.

## संदर्भ साधने -

१) गाठाळ एस.एस., इतिहासलेखन शास्त्र, कैलास पब्लीकेशन्स, औरंगपूरा, औरंगाबाद, पान नं. २५१.
२) गाठाळ एस.एस., पान नं. २५१.
३) सरदेसाई बी.एन. इतिहासलेखन पध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पृष्ठ क्र. १८१.

४) गाठाळ एस.एस. इतिहासलेखनशास्त्र, कैलास पब्लीकेशन्स, औरंगपूरा, औरंगाबाद, पान नं. २५३.
५) डॉ. मोरे अरुणा, इतिहासाची ओळख, के.एस. पब्लीकेशन्स पुणे (२००६) पृष्ठ क्र. १३१.
६) डॉ. मोरे अरुणा, पृष्ठ क्र. १३०.
७) गाठाळ एस.एन., पृष्ठ क्र. २५५.
८) गाठाळ एस.एन. पृष्ठ क्र. २५६.

LBP PUBLICATION